औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

मंगळवार दिनांक २४ जुलै २०१८ रोजी (का.क्र.प. १७) मा.महापौर श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१.	स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
२.	स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
३.	स.स. श्री.विकास रतनलाल जैन
४.	स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
५.	स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६.	स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७.	स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८.	स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९.	स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१०.	स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे
११.	स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
१२.	स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१३.	स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१४.	स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१५.	स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१६.	स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
१७.	स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
१८.	स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
१९.	स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०.	स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१.	स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२२.	स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२३.	स.स. श्री.खान जहांगीर मुलानी
२४.	स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२५.	स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
२६.	स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
२७.	स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
२८.	स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
२९.	स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३०.	स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम

३१.	स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३२.	स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
३३.	स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
३४.	स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३५.	स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
३६.	स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
३७.	स.स. श्री.एडके विकास प्रकाश
३८.	स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
३९.	स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
४०.	स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
४१.	स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
४२.	स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४३.	स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
४४.	स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
४५.	स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
४६.	स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
४७.	स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
४८.	स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
४९.	स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल
५०.	स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५१.	स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
५२.	स.स. श्रीमती बनकर विजया संजय
५३.	स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
५४.	स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
५५.	स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
५६.	स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
५७.	स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
५८.	स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
५९.	स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
६०.	स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे
६१.	स.स. श्री.सोहेल शकील शेख
६२.	स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
६३.	स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६४.	स.स. श्रीमती मिना रामदास गायके
६५.	स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
६६.	स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
६७.	स.स. श्रीमती निकाळजे लता मगन

६८.	स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
६९.	स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
७०.	स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
७१.	स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
७२.	स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
७३.	स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

श्री.राजेंद्र जंजाळ :मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मराठा क्रांती मोर्चाने काल कायगाव येथे आंदोलनाचे आयोजन केले होते. याची कल्पना आंदोलन कर्त्यांनी प्रशासनाला व मा.मुख्यमंत्री महोदय यांना ई-मेल द्वारे दिली होती. तहसीलदार यांना पत्र दिले होते. काल मराठा क्रांती मोर्चा यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणुन जलसमाधी आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन होणार आहे त्याची माहिती प्रशासनाला होती. आंदोलन कर्ते तेथे गेले तेथे प्रशासनाच्या वतीने कोणतीही तयारी करण्यात आली नाही. त्या आंदोलन कर्तेचे मन वळविण्यात आले नाही. हे प्रकरण प्रशासनाने गंभीरतेने घेतले नाही. त्यामूळे श्री.काकासाहेब शिंदे नावाच्या मराठा तरूणाने गोदावरी नदीत उडी घेऊन स्वत:च्या प्राणाचा त्याग केला आहे. मराठा समाजाने या राज्यात आरक्षणासाठी ५८ मोर्चे शांततेत काढले, सरकार सोबत वारंवार चर्चा केली. परंतु महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत मराठा आरक्षणाच्या बाबतीत कोणतीच भुमिका स्पष्ट केली नाही. काल जी घटना गंगापूर कायगाव येथे घडली. त्यास पुर्णपणे प्रशासन व मा.मुख्यमंत्री महोदय जबाबदार आहेत. आज पुर्ण महाराष्ट्र बंद आहे. मराठा समाजाच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत. हा विषय गंभीर झालेला आहे. या घटनेमूळे प्रशासनाचा निषेध नोंदवावा. स्व.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करावी. या सभेसाठी एक ठराव देतो की, ज्या आरक्षणासाठी मराठा समाजाने ५८ मोर्चे काढले. या महापालिकेने मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देऊन जी मेगा भरती जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे. अशा प्रकारचा ठराव पारीत करून शासनास पाठविण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :कालच्या घटनेचा निषेध करतो, मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने एकूण ५८ मोर्चे काढले आहे. मराठा समाजाच्या मागणीचे निवेदन प्रत्येक ठिकाणी प्रशासनाचे प्रमुख मा.मंत्री महोदय यांना देण्यात आले. शांततेत मोर्चे निघाले. लाखो लोक सहभागी होते. कुठेही गालबोट लागलेले नव्हते. कालची जी घटना घडली श्री.काकासाहेब शिंदे यांचा मृत्यू झाला. त्या आंदोलकांनी सुध्दा प्रशासनाला कल्पना दिली होती. जेथे आंदोलन होते तेथे प्रशासनाच्या वतीने लाईफ गार्ड असेल, जीवरक्षक यंत्रणा असेल ती तयारी केली नव्हती. एकीकडे लाखो लोकसंख्येने मोर्चे निघतात. त्या संदर्भात ५८ मार्चे निघाले. त्या प्रत्येक वेळेस

शासनापर्यंत निवेदन गेली आहे. तरी सुध्दा राज्याचे जे प्रमुख आहे. त्यांनी पाहिजे तशी दखल घेतली नाही. त्यामूळे मी सुध्दा या घटनेचा निषेध करतो. मराठा समाजाचे जे मोर्चे झाले, त्यांचे मागण्या ह्या कोणत्याही जाती धर्माच्या कुठल्याही समाजाच्या विरोधात नव्हत्या आणि नाही. मराठा समाजाची अनेक मुले-मूली शिक्षण घेतलेली आहेत. १ ते २ टक्के मार्क कमी पडले तर ते पुढील शिक्षण घेऊ शकत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एमकॉम,एमए झालेली मुले ते हॉटेल मध्ये काम करतांना दिसतात. तर कुणी चहाची टपरी टाकलेली दिसते. कारण त्यांचेकडे फिस भरण्याची तयारी नव्हती म्हणून अशा पध्दतीने त्यांना काम करावे लागत आहे. जो ठराव मांडतो आहे यात मी अनुमोदन आहे. मनपाच्या वतीने असा ठराव मंजुर करून शासनाकडे पाठवावा. जे की, मराठा समाजाच्या ज्या मागण्या आहे. या समाजाच्या तरूणांना न्याय देण्याचे काम शासनाने केले पाहिजे. स्व.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करावी व तसा शोक संदेश त्यांचे कुटूंबीयाना पाठवावा. या सभागृहाच्या भावना शासनास कळवाव्यात. या विषयानंतर ही सभा थांबविण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :७-८ महिन्या मध्ये मराठा समाजाने आदर्श क्रांती मार्चे काढले. जे की, शांततेच्या मार्गाने मोर्चे काढले. त्यांचे मागणीची दखल घेतली जात नाही. दखल घेतली तर अंमलबजावणी होत नाही. त्यातून आंदोलन असेल, कालचा जलसमाधीचा प्रकार असेल यातून ते मागण्या मान्य कराव्यात. मागणी करीत आहे. काल असेच आंदोलन झाले व स्व.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेऊन पाण्यात बूडून त्यांचा मृत्यू झाला. आता शासनाने जे निर्णय करायचे ते तातडीने करावे घोषणा केल्या. त्याची अंमलबजावणी कशी होईल? ते करावे. मराठा क्रांती मोर्चाचे सदस्यांनाही सांगू इच्छितो की, मराठा क्रांती मुक मोर्चा काढून एक आदर्श देशात निर्माण केला. अतिशय मोठे मार्चे व सन्मानपुर्वक शांततेच्या मार्गाने मोर्चे झाले. सर्व समाजाचा मराठा क्रांती मोर्चाच्या मागण्यांना पाठींबा आहे. कारण नसतांना काही मंडळी समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहे. हे आंदोलनच एका दिशेला नेऊन आंदोलनाचेच कुठेतरी प्रश्न चिन्ह निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहे. ज्या काही मागण्या झाल्या त्या त्वरीत शासनापर्यंत पोहचविण्यासाठी कार्यवाही करावी. स्व.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.कैलास गायकवाड :काल मराठा क्रांती मोर्चाचे सदस्य श्री.काकासाहेब शिंदे यांचा दुर्देवी मृत्यू झाला. सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या त्यास अनुमोदन आहे. क्रांती मोर्चोचे सदस्य जलसमाधीचे आंदोलन करणार होते. त्याची माहिती प्रशासन व शासनाकडे मोर्चेकरांनी दिली होती. असे असतांना सरकारने कोणतीही दखल घेतली नाही. त्यामूळे शासनाचा व प्रशासनाचा निषेध करतो. स्व.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.रामेश्वर भादवे :कालचा दिवस हा आषाढी एकादशी असल्यामूळे आनंदाचा दिवस होता. परंतु दुपारी ४ च्या नंतर मराठा समाजाचा तरूण जो आरक्षणासाठी जलसमाधीचे आंदोलन उभे करतो व त्यात श्री.काकासाहेब शिंदे यांनी पाण्यात बुडून

जलसमाधी घेतली. कालचा दिवस हा मराठा समाजासाठी व त्यांचे कूटूंबीयासाठी काळा दिवस ठरला. या आंदोलनाची माहिती पोलीस व प्रशासन विभागास दिली होती. तरी पण पोलीस प्रशासन व तहसीलदार यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यांचा निषेध करतो. त्यांचेवर कार्यवाही करावी. संबंधीत आंदोलन कर्ते पाण्यापर्यत जात होते तर पोलीस विभाग प्रशासन विभाग काय करीत होते? श्री.काकासाहेब शिंदे यांचे कूटूंबीयाच्या दु:खात आम्ही सहभागी सर्व सहभागी आहोत. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :काल श्री.काकासाहेब शिंदे यांनी कायगाव येथे उडी मारून जलसमाधी घेतली. अनेक दिवसांपासून मराठा क्रांती मोर्चा माध्यमातून ५८ मोर्चे शांततेत निघाले. मराठा समाजाची रास्त मागणी होती की, आरक्षण मिळाले पाहिजे. आज कालातंराने परीस्थिती बदलली आहे. आज मराठा समाज शेतीवर अवलंबून आहे. परंतु पाहिजे तेवढे उत्पन्न येत नाही. विविध आर्थीक संकट येते व त्यातून सावरण्याचे काम मराठा समाजाकडून होत नाही. राज्यामध्ये सर्व मराठा समाजाची भावना होती की, आरक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाकडे वारंवार निवेदने दिली. शासनाने आश्वासन दिले. कालची घटना घडली. त्यास मा.मुख्यमंत्री जबाबदार आहेत. श्री.काकासाहेब शिंदे व आंदोलन कर्तेनी मागणी मान्य झाल्या नाही. तर जलसमाधी घेऊ. असे निवेदन प्रशासनाला व पोलीसास दिले होते. परंतु त्याची दखल घेतली नाही. ही घटना गंगापूर तालुक्यातील व या जिल्ह्यातील असल्याने संबंधीतांच्या कुटूंबीयांना १० लक्षची आर्थीक मदत करावी. जो ठराव मांडला त्यास अनुमोदन आहे. तसेच श्री.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करावी व त्यानंतर ही सभा तहकूब करावी.

श्री.जागीरदार अय्युब :एक तरूण मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून जलसमाधी घेतो. दु:खाची गोष्ट आहे. श्रध्दांजली अर्पण करावी. जे आरक्षण मराठा समाजासाठी १६ व मुस्लीम समाजासाठी ५ टक्के मंजूर केले होते. ते आरक्षण मंजूर करावे. यानंतर सभा तहकूब करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.काकासाहेब शिंदे यांनी काल जलसमाधी घेतली. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी. मराठा समाजाने सर्व जातीच्या लोकांसाठी आरक्षण देणेसाठी पाठींबा दिला होता. आतापर्यंत जे मोर्चे मराठा समाजाचे शांततेत काढले. ही घटना या जिल्ह्याच्या अंतर्गत येत असल्याने जो ठराव ठेवला. त्यास मंजूर करावे. आज महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. त्यामूळे आजची सभा तहकूब करावी.

श्री.किर्ती शिंदे :काल जो जलसमाधी घेण्याबाबचा मोर्चा काढला. त्यात श्री.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेऊन त्यांचा मृत्यू झाला. मराठा समाजाच्या ज्या मागण्या आहेत. त्या शासनापर्यंत पोहचविल्या जाव्यात व संबंधीत श्री.काकासाहेब शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर अनेक आंदोलने यशस्वी व शांततेत पार पडले. याची सर्व जगभर नोंद झाली आहे. परंतु कालची घटना दुर्देवी झाली. त्या मोर्चामध्ये श्री.काकासाहेब शिंदे हे एक मोर्चेकरी होते. मोर्चा

निघणार याची कल्पना पोलीस विभाग व महसूल विभागाचे अधिकारी यांना दिली होती. त्याची दखल अधिकारी यांनी घेतली नाही. श्री.काकासाहेब शिंदे हे प्रामाणिक व्यक्ती होते. त्यांनी माझेकडे चालक म्हणून काम केले आहे. त्यांचे कुटूंबीयास जेवढी मदत करता येईल ती करावी. माझे परीवारातर्फे व या सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कालची घटना वाईट होती. श्री.काकासाहेब शिंदे यांना मृत्यूला सामोरे जावे लागले. झालेल्या घटनेचा एमआयएम पक्षातर्फे निषेध करतो. या प्रकरणात जे जे अधिकारी दोषी असेल कार्यवाही करावी. मराठा समाजास १६ व मुस्लीम समाजास ५ टक्के आरक्षण देण्यात यावे. श्री.काकासाहेब शिंदे यांचा काल मूत्यू झाला. त्यांचे कुटूंबीयाच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

श्री.भगवान घडमोडे :कालच्या आंदोलनामध्ये काकासाहेब शिंदे यांचा मृत्यू झाला. आंदोलन कर्त्यानी प्रशासनाला या बाबत निवेदन दिले होते. परंतु प्रशासनाने काळजी घेतली नाही. मराठा समाजाने आतापर्यंतचे मोर्चे शांततेच्या मार्गाने काढले व देशात आदर्श निर्माण होईल. असे मोर्चे काढले. कालही तसेच आंदोलन होते. परंतु कुठे तरी प्रशासनाचा निष्काळजीपणा झाल्यामूळे श्री.काकासाहेब शिंदे यांना जीव गमवावा लागला. मराठा समाज न्याय हक्काच्या मागणी करता आंदोलन करीत आहे. या राज्यात ६० ते ७० घराने आहे. ज्यांनी फक्त सत्ता उपभोगली व मराठा समाजाचा तरूण याची काळजी घेतली नाही. ते साचत साचत आले व त्याचा स्फोट आता होतो आहे मराठा समाजाला काही दिले नाही फक्त वापर करण्यात आला. सामान्य समाजाला त्या सत्तेचा लाभ मिळाला नाही. पदेही मिळाले असतील ते भाजपा-सेना मुळे राष्ट्रवादी-कॉग्रेस मूळे मिळाली नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :राजकारणाचा संबंध नाही. या ठिकाणी निषेध नोंदविण्यात आलेला आहे. जे बाहेरचे लोक राजकारण करीत असेल त्यांचा समाजाशी कोणत्याच प्रकारचा संबंध नाही. हे आंदोलन पक्षाच्या व्यक्तीच्या विरोधात नाही. मराठा समाजाने अनेक वर्षापासून मागणी केलेली आहे. कुणाची सत्ता आहे. कोणाची होती? त्याचेशी घेणे-देणे नाही. हे आंदोलन मराठा समाजाच्या तरूणांनी उभारलेले आहे.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी सभागृहात बोलत होते.

मा.महापौर :भावनिक विषय मांडू नये. सर्वांनी खाली बसावे.

श्री.भगवान घडमोडे :पक्षाशी घेणे देणे येथे नाही. मराठा समाजाला न्याय मिळावा. श्री.काकासाहेब शिंदे यांचे कूटूंबास जी मदत देणार आहे. त्याबरोबरच मी एक महिन्याचे मानधन देतो. न्याय हक्काच्या मागणीसाठी आंदोलन होते. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. श्रध्दांजली अर्पण करावी. एक महिन्याचे मानधन देण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :काल जी घटना झाली. तो विषय समोर आहे. अनेक वर्षापासून या समाजाची आरक्षणाची मागणी होती. कुठल्याही समाजाचे आरक्षण कमी करून मागणी करीत नाही. या राज्यात ५० टक्के मराठा समाज आहे. मोठया भावाची भुमिका या समाजाने निभावली. पुर्वी व आताची परीस्थिती वेगळी आहे. परीस्थिती बदलत गेली. शेतीवर अवलंबून असणारे ही मंडळी असली, तरी आज

परीस्थिती काय आहे? हे सर्वांना माहिती आहे. या समाजाच्या तरूणाच्या पाठीशी उभे कसे राहता येईल? ते पहावे. ५८ मार्चे झाली. इतर समाजाची मंडळीही त्यात होती. जे की त्यांना माहित आहे. खरोखरच या आज मराठा समाजाची अवस्था दयनीय आहे. बहुजन समाज, साळी, कोळी, माळी, मुस्लीम समाजपण मोर्चामध्ये होते. जी निवेदने दिली गेली. ती सर्व राजकीय नेते मंडळी शासन यांनी विचार करायला पाहिजे होता. त्या पलीकडे जाऊन काय भुमिका आहे? ते मांडायला पाहिजे होते. मोर्चे निघाले शांततेत होते. आदर्श घेतला पाहिजे. अशी चर्चा होत होती. खरच आदर्श घेणे सारखे होते. आदर्शही घेतला ज्या ज्या वेळेस छत्रपती शिवाजी महाराज राज्य चालवित होते त्यात सर्व समाजाचे लोक एकत्रित आणून राज्य उभे केले होते. या विषयाला वेगळे वळण लागू नये जे विषय मांडले त्या कूटूंबीयाच्या मागे उभे राहणे गरजेचे आहे. मनपाच्या वतीने काय मदत करता येईल? ते करावे. सर्व मान्यवर मंडळीनी एकत्रीत येऊन राज्याचे प्रमुख यांचेकडे ठराव पाठविला पाहिजे. या तरूणाच्या मागे आपण उभे रहावे. कुठल्याही समाजाच्या आरक्षण कमी करून आरक्षण द्यावे असे मराठा समाजाचे मत नाही. जो ठराव दिला तो एक मताने हा ठराव मंजूर करावा.

श्री.प्रमोद राठोड :गंगापूरचे मराठा क्रांती मार्चाचे श्री.काकासाहेब शिंदे यांनी काल जलसमाधी घेतली दुर्देवी घटना आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावे ही सर्वांचीच मागणी आहे. त्यास आमचा सर्वाचा पाठींबा आहे. हा प्रश्न लवकर मार्गी लागावा अशी सर्वांचीच भावना आहे. प्रशासनाने तेथे उपाययोजना केल्या नाही म्हणून जी शिक्षा असेल ती त्या अधिकारी यांना दिली पाहिजे. हा प्रश्न सुटावा. राज्य शासनापर्यंत भावना पोहचाव्यात. मनपातर्फे काय मदत त्या कूटूबांस करू शकतो? ती करावी.

श्री.आत्माराम पवार :मराठा समाजाने आजपर्यत शांततेत मोर्चे काढले. कालच्या आंदोलनाचे निवेदन तहसीलदार पोलीस विभागाला दिले होते तेथे कुणीही आवश्यक व्यवस्था केली नाही. त्यामूळे श्री.काकासाहेब शिंदे यांचा मृत्यू झाला. त्यामूळे प्रशासनाचा निषेध करतो व श्री.शिंदे यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मागच्या शासनाने घाईगडबडीने आरक्षण दिले. कुणी तरी त्यास चॅलेंज केले मा.कोर्टाकडून स्थगिती मिळविली. त्यानंतर शासनाने त्यांची भुमिका मा.कोर्टात मांडायला वेळ लावला म्हणून प्रकरण प्रलंबीत आहे. येथे कुणावर आरोप व राजकारण करणार नाही. मराठा क्रांती मोर्चामध्ये कार्यकर्ते हे सर्व पक्षाचे आहे. ते समाजाच्या कामासाठी पुढे आलेले आहे. त्यामूळे कोणी काय केले? कोण काय करणार आहे? व कोण काय करू शकते? याबद्दल चर्चा नको. एवढ्या दिवसापांसून या मोर्चाचे सदस्य व अखंड मराठा समाजाचे लोक रस्त्यावर उतरल्यानंतर सुध्दा जी मागणी केली ती मागणी शासनाने मान्य केली नाही. १६ टक्के आरक्षण हे वेगळे मागीतले आहे. कुणाच्या आरक्षणातून मागणी केली नाही. त्यामूळे वाईट वाटण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात अनेक दिवसापासून दुष्काळ आहे. शेती करणारा बहुसंख्य मराठा समाज आहे. या समाजाची

परीस्थिती हलाखिची झाली आहे. मराठा समाजाचा तरूण हुशार असूनही फिस देऊ शकत नाही. त्यामूळे शिक्षणापासून वंचीत आहे. अनेक क्षेत्रात संधी मिळायला पाहिजे ती मिळत नाही. शासनाने मेगा नोकर भरती जाहीर केली त्या भरतीत १६ टक्के आरक्षण मराठा समाजाला दिल्याशिवाय भरती करू नये अशी मागणी कालच्या मोर्चामध्ये होती. प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला जातो. मुख्यमंत्री कार्यालयात कळविले होते. तरी आंदोलनाच्या ठिकाणी प्रशासनाने तयारी केली नाही. तयारी केली असती, तर श्री.काकासाहेब शिंदे या मुलाचा जीव गेला नसता. कुणाच्या तरी घरातील मुलगा गेला. त्यांचे दु:ख समजावून घेतले पाहिजे. आताच सांगितले की, एक महिन्याचे मानधन देणार आहे. परंतु त्यांचे कुटूंबीयांनी सांगितले की, कोणतीही आर्थीक मदत घ्यायची नाही. त्यांचे स्वाभीमानाला ठेच पोहचणार नाही. अशा प्रकारची भुमिका आपल्या सर्वांची असावी. मग तो कोणत्याही समाजाचा व्यक्ती असो कुणाचा जीव गेल्यानंतर आपल्या भावना त्यांचेशी जोडल्या गेल्या पाहिजे. तमाम मराठा समाजाची मागणी आहे की, मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे आणि मराठा समाजाची भावना या सभागृहाच्या माध्यमातून ठरावाच्या माध्यमातून राज्य शासनापर्यंत पोहविण्यात याव्यात.

श्री.विकास जैन :श्री.काकासाहेब शिंदे हे आपल्यात नाही. त्यांनी प्राणाची आहुती दिली. त्यांचे हे बलिदान सर्वांच्या कित्येक वर्ष आठवणीत राहणार आहे. मी माझे तर्फे पक्षा तर्फे श्रध्दांजली अर्पण करावी व त्यानंतर सभा तहकूब करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :डॉ.भागवत कराड माजी महापौर यांचे मातोश्री स्व.गयाबाई कराड यांचेही निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.उपमहापौर :श्री.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेतली. सर्वांनी दु:खद भावना मांडल्या. यापुर्वी मराठा समाज सर्वांच्या पाठीशी आरक्षणासाठी उभा होता. त्याच मराठा समाजाला आरक्षणासाठी आंदोलने करावी लागते. कालच्या आंदोलनात श्री.शिंदे यांचा मृत्यू झाला. प्रशासनाला आंदोलनकर्त्यांनी निवेदन दिले होते परंतु तेथे काहीही तयारी केली गेली नाही. त्यामूळे काकासाहेब शिंदे यांना प्राण गमवावा लागला. या प्रकरणात जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. जे की, यानंतर जे मोर्चे निघतील. प्रशासनाने गांभीर्याने घेतले पाहिजे. आता राज्य शासन नोकर भरती करणार आहे. त्यात १६ टक्के आरक्षण मराठा समाजाला द्यावे. जो प्रस्ताव दिला. त्यास पक्षाचा पाठींबा आहे. या मुलाच्या परीवारास आर्थीक मदत द्यावी. हा आपल्या जिल्ह्यात आघात झाला आहे. ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यांचे परीवाराशी चर्चा करून मदत देण्याची कार्यवाही करावी. यानंतर सभा तहकूब करावी.

मा.महापौर :कालच्या घटनेत स्व.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेतली. त्यात त्यांचा मृत्यू झाला. तसेच माजी महापौर डॉ.भागवत कराड यांचे मातोश्री स्व.गयाबाई कराड यांचे निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. सर्वांनी उभे रहावे.

यावेळी स्व.काकासाहेब शिंदे स्व.गयाबाई कराड यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

विषय क्रमांक ५७२:- **(ऐनवेळीचा विषय - उपस्थित सर्व स.सदस्यांच्या मागणीनुसार तातडीने घेण्यात आलेला प्रस्ताव)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजाने महाराष्ट्रात ५८ मोर्चे काढले. परंतु, शासनाने आजही या बाबत कोणताच निर्णय घेतला नाही. त्यामुळे मराठा समाजाच्या तरुणांना शैक्षणिक व नोकरी मध्ये संधी मिळण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. शासनाने जी मेगा भरती जाहिर केली आहे त्यामध्ये १६% जागा मराठा समाजाच्या तरुणांना मिळाव्यात यासाठी शासनाने आरक्षण त्वरीत जाहिर करावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक:-श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,श्री.विजय साईनाथ औताडे,श्रीमती मिना रामदास गायके, श्री.राजगौरव हरीदास वानखेडे, श्री.कचरु छगनराव घोडके, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

अनुमोदक:-श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे,श्री.त्र्यंबक गणपत तुपे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे, श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :मराठा आरक्षण हा संवेदनशील आणि भावनिक विषय आहे. सर्वच स.सदस्यांनी मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विविध मागण्याकरीता सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वेगवेगळी आंदोलने केली जात आहेत. सर्वच पक्षाच्या वतीने या मागणीसाठी पाठींबा सभागृहात दर्शविला आहे. मराठा समाजाच्या सर्व मागण्याकरीता हे सभागृह त्यांच्या पाठीशी आहे. तशी शिफारस ठरावाच्या अनुषंगाने माननीय राज्य शासनाकडे करीत आहोत. या ठिकाणी उल्लेख झाला की, इतर समाजाने आदर्श घ्यावा की, मराठा समाजाने जे अशा प्रकारचे वेगवेगळे ५८ शांततेत मोर्चे काढून आपल्या भावना शासना पर्यंत कळविल्या आहे. काल जो प्रकार कायगाव येथे झाला. ही घटना निषेधार्थ आहे. मोर्चा काढून जलसमाधी घेण्याचा निर्णय श्री.काकासाहेब शिंदे यांनी पोलीस विभाग व तहसीलदार यांना पुर्व कल्पना दिली होती. शासनाकडेही त्याची कल्पना त्यांनी दिली होती. याची प्रशासनाचे अधिकारी, तहसीलदार व पोलीस विभाग यांनी गंभीर दखल घेतली नाही. कदाचीत दखल घेतली असती तर श्री.काकासाहेब शिंदे यांचे प्राण वाचले असते म्हणून पोलीस प्रशासन व तहसीलदार यांच्या निषेधाचा ठराव मंजूर करण्यात येतो. मराठा क्रांती मोर्चाची मुख्य मागणी अशी की, मराठा समाजाला नोकरीमध्ये व शिक्षण क्षेत्रात आरक्षण हवे होते. या दोन्ही मागण्यांच्या बाबतीत मराठा क्रांती मोर्चामार्फत करण्यात आलेल्या मागणीची शासनाने तात्काळ दखल घ्यावी व ती मंजुर करून त्याची अंमलबजावणी करावी. अशी शिफारस या ठरावाच्या माध्यमातून करण्यात येते.

तसेच मुस्लीम समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत आधीच्या सरकारने जो निर्णय घेतला होता त्याचीही शासनाने अंमलबजावणी करावी अशी शिफारस करण्यात येते.

स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांनी सभागृहास सांगीतले आहे की, श्री.शिंदे यांचे कुटूंबीयाने कुठलीच मदत घेणार नाही. परंतु सामाजिक बांधीलकी

म्हणून स.सदस्यांच्या मागणीनुसार त्यांचे मन वळवून मदतीची रक्कम स्विकारण्याची त्यांची मानसिकता झाल्यानंतर श्री.शिंदे यांच्या कुटूंबीयांना र.रु.१० लक्ष आर्थीक मदत देण्याचा ठराव मंजूर करण्यात येतो.

श्री.काकासाहेब शिंदे यांच्या कुटूंबीयांच्या दु:खात हे सभागृह सामिल आहे. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. मराठा समाजाने ५८ मोर्चे काढले. शासनाने अद्याप सुध्दा निर्णय घेतलेला नाही. तो निर्णय घेण्यासाठी स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांनी ऐनवेळीचा प्रस्ताव सभागृहात ठेवला आहे. त्यामध्ये मराठा समाजाच्या शैक्षणिक व नोकरीमध्ये त्या संधी मिळविण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. शासनाने मेगा भरती जाहीर केली आहे. त्यामध्ये १६ टक्के जागा मराठा समाजाच्या तरूणांना मिळाव्यात यासाठी शासनाने त्वरीत आरक्षण जाहीर करावे असा प्रस्ताव आहे. या प्रस्तावास अनुमोदक म्हणून बहुतांश सर्वच पक्षांचे स.सदस्य आहेत. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

दुसरा ठराव श्री.भाऊसाहेब जगताप यांनी ठेवला आहे. त्यांनी मराठा क्रांती मोर्चातून जे आंदोलन झाले व त्या माध्यमातून श्री.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेतली. त्यांचे कुटूंबीयांना र.रु.१० लक्ष आर्थीक मदतीची मागणी केली आहे. त्यातही सर्वच पक्षांचे बहुतांशी स.सदस्य सुचक अनुमोदक आहेत. हे दोन्ही प्रस्ताव मंजूर करण्यात येतात.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गंगापुर तालुक्यातील श्री.काकासाहेब शिंदे यांच्या जलसमाधी आंदोलनाची प्रशासनाचे अधिकारी, तहसीलदार व पोलीस विभाग यांनी दखल घेतली नाही म्हणून पोलीस प्रशासन व तहसीलदार यांच्या निषेधाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो. तसेच मराठा क्रांती मोर्चामार्फत आलेल्या आरक्षणाची मागणीची शासनाने तात्काळ दखल घ्यावी व आरक्षण व इतर मागण्या मंजूर करुन अंमलबजावणी करावी अशी शिफारस करण्यात येते.

शासनाने जी मेगा भरती जाहीर केली आहे त्यामध्ये तसेच मुस्लीम समाजाच्या बाबतीत आधीच्या सरकारने निर्णय घेतला आहे त्यानुसार त्याचीही अंमलबजावणीची शिफारस शासनाकडे करण्यात येते. मेगा भरती प्रक्रियेमध्ये १६ टक्के जागांचे मराठा समाजासाठी आरक्षण शासनाने त्वरीत जाहीर करावे. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येत असून शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी ठराव प्रशासनामार्फत त्वरीत पाठविण्यात यावा. यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५७३:- **(ऐनवेळीचा विषय - उपस्थित सर्व स.सदस्यांच्या मागणीनुसार तातडीने घेण्यात आलेला प्रस्ताव)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २३.०७.२०१८ रोजी मराठा क्रांतीमोर्चा आयोजित जलसमाधी आंदोलन दरम्यान श्री.काकासाहेब शिंदे कायगाव टोका येथे बूडून त्यांचा मृत्यु झाला. त्याची आर्थिक परिस्थिती गरीबीची असून त्यांना महानगरपालिकेतर्फे मदत म्हणुन र.रु.१० लक्ष देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,

अनुमोदक:-श्री.सोहेल शकिल शेख, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.त्र्यंबक गणपत तुपे, श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे,

मा.महापौर :श्री.भाऊसाहेब जगताप यांनी ठेवला आहे. त्यांनी मराठा क्रांती मोर्चातून जे आंदोलन झाले व त्या माध्यमातून श्री.काकासाहेब शिंदे यांनी जलसमाधी घेतली. त्यांचे कुटूंबीयांना र.रु.१० लक्ष आर्थीक मदतीची मागणी केली आहे. त्यातही सर्वच पक्षांचे बहुतांशी स.सदस्य सुचक, अनुमोदक आहेत. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक २३.०७.२०१८ रोजी मराठा क्रांती मोर्चा आयोजित जलसमाधी आंदोलना दरम्यान श्री.काकासाहेब शिंदे या तरुणाचा कायगाव टोका येथे गोदावरी नदीमध्ये बूडून दुर्दैवी मृत्यु झाला. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने सामाजिक बांधीलकी म्हणुन त्यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेतर्फे र.रु.१०.०० लक्ष आर्थीक मदत देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

तथापि, श्री.शिंदे यांचे कुटूंबीयाने कुठलीच मदत घेणार नाही अशी माहिती स.सदस्य श्री.राजेंद्र जंजाळ यांनी सभागृहास दिलेली आहे. तरी देखील सामाजिक बांधीलकी म्हणून स.सदस्यांच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबियांचे मन वळवून मदतीची रक्कम स्विकारण्याची त्यांची मानसिकता झाल्यानंतर आंदोलना दरम्यान मृत्यु पावलेले श्री.काकासाहेब शिंदे यांच्या कुटूंबीयांना र.रु.१० लक्ष आर्थीक मदत देण्यात यावी. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५७४:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता एकुण रक्कम रु. ५,४५,४९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीनुसार वॉर्डनिहाय विविध एजन्स्झी कडून कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यात येत आहे.

पथदिवे देखभाल दुरुस्तीची कामे अत्यावश्यक सेवेतील असल्याने दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढीसह रक्कम रु. २७९.९८/- लक्षचा वाढीव खर्चा अधीक जी एस टी रक्कम यासह प्रशासकीय मान्यतेंस्तव तथापि वाढीव खर्च विद्युत देखभाल दुरुस्ती (शहर व उद्याने) या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. प्रस्ताव कार्यात्तर मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

अ.क्र	कामाचे नांव	अं.प.र. रुपये लाखात	गुत्तेदाराचे नांव	कार्यादेश दिनांक	वाढीव रक्कम रुपये लाखात	एकूण रक्कम
१	२	३	४	५	६	७
१	प्रभाग अ भाग -१ वार्ड क्र. १,४,११, २२,२३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९०+६७.१०	मे.स्टलिंग इलेक्ट्रीकल्स वर्क्स औरंगाबाद	२५७/२०१५ १२/१०/२०१५	१४.२७	१०६.२७
२	प्रभाग अ भाग -२ वार्ड क्र. १३,१४,१५,१६,१७,१८, मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८०+४७.२०	मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स्	२६५/२०१५ १२/१०/२०१५	१२.०१	८४.०१
३	प्रभाग अ भाग -३ वार्ड क्र. १२,१९,२०,२१,४९,५०,५२, मधील	२४.८०+६७.४१	मे.स्टलिंग इलेक्ट्रीकल्स	२६४/२०१५ १२/१०/२०१५	१६.५८	१०८.७९

	पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.		वर्क्स औरंगाबाद			
४	प्रभाग ब भाग -१ वार्ड क्र. २,७,८,३२,३३,३४,३५, मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९८+६५.८२	मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स्	२६६/२०१५ १२/१०/२०१५	१६.६५	१०७.४५
५	प्रभाग ब भाग -२ वार्ड क्र. ३६,४०,६२,६३,६४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.४५+६७.८८	मे.श्री. इलेक्ट्रीक्ल्स ॲन्ड रेफ्रिजरेशन औरंगाबाद	२६२/२०१५ १२/१०/२०१५	१६.३७	१०८.७०
६	प्रभाग ब भाग -३ वार्ड क्र. ६,९,१०,२८,२९,३०,३१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.६५+६६.२७	मे.आकाश इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२६१/२०१५ १२/१०/२०१५	१६.४२	१०७.३४
७	प्रभाग ब भाग -४ वार्ड क्र. ३८ एमआयडीसी मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९३+३७.६९	मे.स्टलिंग इलेक्ट्रीकल्स वर्क्स औरंगाबाद	२५२/२०१५ १२/१०/२०१५	७.९१	७०.५३
८	प्रभाग क भाग -१ वार्ड क्र. २४,२५,२६,२७,४१,४२ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.५०+५४.३८	मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स्	२६९/२०१५ १२/१०/२०१५	१२.२३	९१.११
९	प्रभाग क भाग -२ वार्ड क्र. ४३,४४,५८,५९,६०,६१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८०+४९.९५	मे.ईगल इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२७२/२०१५ १४/१०/२०१५	१३.२८	८८.०३
१०	प्रभाग क भाग -३ वार्ड क्र. ४५,५५,५६,५७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.४८+२७.५३	मे.ईगल इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२७३/२०१५ १४/१०/२०१५	८.७९	६०.८०
११	प्रभाग ड भाग -१ वार्ड क्र. ४७,४८,५१,५३,५४,६६,६७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९०+६३.२४	मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स ॲन्ड सर्व्हिसेस औरंगाबाद	१७/२०१५ १८/११/२०१५	१५.४१	१०३.५५
१२	प्रभाग ड भाग -२ वार्ड क्र. ६८,६९,७०,७१,७२,७३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८+६६.०६	मे.स्टलिंग इलेक्ट्रीकल्स वर्क्स औरंगाबाद	२६०/२०१५ १२/१०/२०१५	१५.३६	१०६.२२
१३	प्रभाग ड भाग -३ वार्ड क्र. १०३,१०४, व मेन रोडवर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८०+४८.८१	मे.असंसो लाईट्स औरंगाबाद	२५३/२०१५ १२/१०/२०१५	१२.४१	८६.०२
१४	प्रभाग ई भाग -१ वार्ड क्र. ३७,८६,८७,८८,८९,९० मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.७०+३३.९७	मे.साकळगावकर इलेक्ट्रीकल्स वर्क्स औरंगाबाद	२७१/२०१५ १३/१०/२०१५	९.७०	६८.३७

१५	प्रभाग ई भाग -२ वार्ड क्र. ८१,८२,८३,८४,८५,९१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८०+६०.६९	मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स औरंगाबाद सह संस्था लि.	२५५/२०१५ १२/१०/२०१५	१२.२९	९७.७८
१६	प्रभाग ई भाग -३ वार्ड क्र. ७८,७९,८०,९२,९३,९४,९५ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९०+६७.२७	मे.पुजा इलेक्ट्रीक्ल्स औरंगाबाद	२५८/२०१५ १२/१०/२०१५	१६.४२	१०८.५९
१७	प्रभाग फ भाग -१ वार्ड क्र. ७४,७५,७६,७७,९६,९७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.७०+४०.६८	मे.असंसो लाईट्स औरंगाबाद	२५९/२०१५ १२/१०/२०१५	११.८०	७७.१८
१८	प्रभाग फ भाग -२ वार्ड क्र. १०१,१०२,१०५,१०६,१०७,१०८ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९०+५७.८७	मे.न्यु इरा इलेक्ट्रीकल्स्	२६३/२०१५ १२/१०/२०१५	१४.२६	९७.०३
१९	प्रभाग फ भाग -३ वार्ड क्र. ९८,९९,१००,१०९,११०,१११,११३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.८०+७४.१२	मे.मातोश्री इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२५६/२०१५ १२/१०/२०१५	१७.२४	११६.१६
२०	प्रभाग फ भाग -४ वार्ड क्र. ६५,११२, व मुख्य रस्ते मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	२४.९०+६९.९६	मे.असंसो लाईट्स औरंगाबाद	२५४/२०१५ १२/१०/२०१५	१५.५८	११०.४४
२१	देवळाई सातारा येथील पथदिवे देखभाल दुरुस्ती नविन पथदिवे लावणे.	२५.००+१४.००	मे.मातोश्री इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२५८/२०१५ १२/१०/२०१५	५.००	४४
२२	देवळाई सातारा येथे पथदिवे देखभाल दुरुस्ती नविन पथदिवे लावणे.	२५.००	मे.मातोश्री इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद	२६७/२०१५ १२/१०/२०१५	--	००
	एकुण रक्कम				२७९.९८	१९४८.३७

दरम्यानच्या काळात शहरात एलईडी पथदिवे लावण्याचे काम सुरु झालेले आहे. सद्यस्थितीत मुख्य रस्त्यावरील एलईडी लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे. देखभाल दुरुस्तीच्या कामास दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंतच्या खर्चास व मुदतवाढीस मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त आहे. आता दि.३१/१२/२०१८ पर्यत मुदतवाढ प्रशासकीय स्तरावरुन कामे खोळंबु नये व नागरीकांना त्रास होवु नये म्हणुन तसेच चार वेळा निविदा मागविल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्यामुळे या मुदतवाढीस शिफारस करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय सन व विविध सांस्कृतिक महोत्सव व धार्मिक सन चालू आहे.पथदिवे देखभाल दुरुस्ती अत्यावश्यक सेवा असल्याने संबंधीत एजन्सीला व कामास दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढ तसेच तक्त्यात नमुद केल्यानुसार वाढीव खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रशासनातर्फे शिफारस करण्यात येत आहे. सदरील कामाचा वाढीव खर्च अर्थसंकल्प २०१८-२०१९ या

वित्तीय वर्षातील विद्युत देखभाल शहर व उद्याने या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. वॉर्ड निहाय दर्शविलेल्या पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी दिनांक १.७.२०१८ ते दिनांक ३१.१२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास जी एस टी लागु झाल्याच्या तारखेपासुन म्हणजेच दि.१/७/२०१७ पासुन सर्व कंत्राटदार यांना जी एस टी रक्कमेसह देय व आवश्यक लागणाऱ्या वाढीव रक्कमेसह मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील वॉर्डनिहाय पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने शहरातील वॉर्डनिहाय पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे कामास संबंधीत एजन्सीला दिनांक ०१.०७.२०१८ ते दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच जीएसटी लागु झाल्याच्या तारखेपासुन म्हणजेच दि.०१.०७.२०१७ पासुन सर्व कंत्राटदार यांना जीएसटी रक्कमेसह देय व आवश्यक लागणाऱ्या वाढीव रक्कमेस तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.१ ते २२ मध्ये दर्शविलेल्या तपशीलानुसार या कामाकरीता लागणाऱ्या र.रु.२७९.९८ लक्षच्या वाढीव खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५७५:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दलित वस्तींचा सर्वागीण विकास करण्याकरीता खालील प्रभागामध्ये अत्यावश्यक विविध नागरी सुविधा कामे करण्यासाठी शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-१९ या योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

अ.क्र.	कामाचे नाव	निधी
१.	वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत एकतानगर गल्ली क्र.०१ व ०२ मध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
२.	वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर गल्ली क्र.०३ व ०४ येथील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
३.	वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
४.	वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथे नवीन विद्युत पथदिवे लावणे.	रु.२० लक्ष.
५.	वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील अंतर्गत गल्ल्यांमध्ये जलनि:सारण वाहिनी टाकणे.	रु.२० लक्ष.
६.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नागसेन विद्यालय येथे आनंद गाडे चौक पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.	रु.५० लक्ष.
७.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर केसरसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.	रु.६५ लक्ष.
८.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत रेल्वे कॉर्टर, पदमपाणी कॉलनी ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.	रु.५० लक्ष.
९.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत अमोदी हिल्स्, स्वप्नपुर्ती कॉलनी येथे	रु.२५ लक्ष.

	सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	
१०.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत बेगमपुरा, पहाडसिंगपुरा येथे जलवाहिनी टाकणे.	रु.३० लक्ष.
११.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत जगदीशनगर ते न्यु पहाडसिंगपुरा देवानंदीनगर मार्गे रस्ता तयार करणे.	रु.४० लक्ष.
१२.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत बेगमपुरा प्रभागात विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	रु.२५ लक्ष.
१३.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर येथील बौध्दविहाराच्या सभागृहाचा विकास करणे.	रु.१५ लक्ष.
१४.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर व भोईवाडा येथे सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	रु.४० लक्ष
१५.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर भोईवाडा येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.	रु.१५ लक्ष
१६.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर भोईवाडा येथील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे.	रु.१० लक्ष
१७.	वॉर्ड क्र.११२,शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.७५ लक्ष
१८.	वॉर्ड क्र.११२,शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंच्या रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणे	रु.२५ लक्ष
१९.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत श्री.जावेद पत्रकार यांच्या गल्लीतील काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२०.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत श्री.जावेद पत्रकार ते बेकरी पर्यंत असलेल्या छोट्या गल्लीमध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२१.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत पुंडलीकनगर (पश्चिम) भागामध्ये रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२२.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत नेहरुनगर येथील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२३.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.गव्हाने यांच्या घरापासून ते श्री.देशमुख यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.१५ लक्ष
२४.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.साळवे यांच्या घरापासून नाल्यापर्यंत काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२५.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत किर्ती कलेक्शन ते नाल्यापर्यंत काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२६.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.पाटील हॉस्पीटल ते नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.१५ लक्ष
२७.	वॉर्ड क्र.७५,उत्तमनगर अंतर्गत श्रध्दा चाटभंडार ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२० लक्ष
२८.	झोन क्र.०९ अंतर्गत श्री.शिरसाट यांच्य घरापासून ते सुंदर हॉटेल जवाहर	रु.१५ लक्ष

	कॉलनी परिसरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	
२९.	झोन क्र.०९ अंतर्गत जवाहर कॉलनी परिसरातील अजिंक्य ज्वेलर्स ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३०.	झोन क्र.०६ अंतर्गत मा.उच्च न्यायालया पाठीमागे छोटे दुर्गामाता मंदिर ते श्री.संतोष चव्हाण यांचे दुकानापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.३५ लक्ष
३१.	झोन क्र.०६ अंतर्गत नेहरुनगर भागामध्ये विविध ठिकाणी विविध गल्ल्यामध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३२.	वॉर्ड क्र.०३, एकतानगर येथे विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे.	रु.१० लक्ष
३३.	वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३४.	वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.	रु.२५ लक्ष
३५.	झोन क्र.०६ अंतर्गत न्यायनगर भागामध्ये सिमेंट काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३६.	वार्ड क्रं ७०, पदमपुरा अंतर्गत मोचीमोहल्ला येथे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३७.	वार्ड क्रं ७०, पदमपुरा अंतर्गत नवी बस्ती येथे गल्ल्यांमध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष

सुचक:-श्री.विकास रतनलाल जैन, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
अनुमोदक:-श्री.गजानन भानुदास मनगटे,श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे,श्री.बन्सी ग्यानु जाधव,
श्री.सचिन सुर्यकांत खैरे

मा.महापौर :प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दलित वस्तींचा सर्वागीण विकास करण्याकरीता खालील प्रभागामध्ये अत्यावश्यक विविध नागरी सुविधा कामे करण्यासाठी शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-१९ या योजने अंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

अ.क्र.	कामाचे नाव	निधी
१.	वॉर्ड क्र.१०७,ईटखेडा अंतर्गत एकतानगर गल्ली क्र.०१ व ०२ मध्ये सिमेंट काँक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
२.	वॉर्ड क्र.१०७,ईटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर गल्ली क्र.०३ व ०४ येथील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
३.	वॉर्ड क्र.१०७,ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट काँक्रीटींग करणे.	रु.२० लक्ष.
४.	वॉर्ड क्र.१०७,ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथे नवीन विद्युत पथदिवे लावणे.	रु.२० लक्ष.
५.	वॉर्ड क्र.१०७,ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील अंतर्गत गल्ल्यांमध्ये जलनि:सारण वाहिनी टाकणे.	रु.२० लक्ष.
६.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नागसेन विद्यालय येथे आनंद गाडे चौक पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.५० लक्ष.
७.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर केसरसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.६५ लक्ष.

८.	वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत रेल्वे कॉर्टर, पदमपाणी कॉलनी ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.५० लक्ष.
९.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत अमोदी हिल्स्, स्वप्नपुर्ती कॉलनी येथे सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	रु.२५ लक्ष.
१०.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत बेगमपुरा, पहाडसिंगपुरा येथे जलवाहिनी टाकणे.	रु.३० लक्ष.
११.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत जगदीशनगर ते न्यु पहाडसिंगपुरा देवानंदीनगर मार्गे रस्ता तयार करणे.	रु.४० लक्ष.
१२.	वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा अंतर्गत बेगमपुरा प्रभागात विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	रु.२५ लक्ष.
१३.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर येथील बौध्दविहाराच्या सभागृहाचा विकास करणे.	रु.१५ लक्ष.
१४.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर व भोईवाडा येथे सिमेंट काँक्रीट रस्ते तयार करणे.	रु.४० लक्ष
१५.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर भोईवाडा येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.	रु.१५ लक्ष
१६.	वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर भोईवाडा येथील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे.	रु.१० लक्ष
१७.	वॉर्ड क्र.११२,शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.७५ लक्ष
१८.	वॉर्ड क्र.११२,शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंच्या रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणे	रु.२५ लक्ष
१९.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत श्री.जावेद पत्रकार यांच्या गल्लीतील काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२०.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत श्री.जावेद पत्रकार ते बेकरी पर्यंत असलेल्या छोट्या गल्लीमध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२१.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत पुंडलीकनगर (पश्चिम) भागामध्ये रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२२.	वॉर्ड क्र.७९,न्यायनगर अंतर्गत नेहरुनगर येथील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२३.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.गव्हाने यांच्या घरापासून ते श्री.देशमुख यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.१५ लक्ष
२४.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.साळवे यांच्या घरापासून नाल्यापर्यंत काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२५.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत किर्ती कलेक्शन ते नाल्यापर्यंत काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
२६.	वॉर्ड क्र.७५,बौध्दनगर अंतर्गत श्री.पाटील हॉस्पीटल ते नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.१५ लक्ष

२७.	वॉर्ड क्र.७५,उत्तमनगर अंतर्गत श्रध्दा चाटभंडार ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२० लक्ष
२८.	झोन क्र.०९ अंतर्गत श्री.शिरसाट यांच्य घरापासून ते सुंदर हॉटेल जवाहर कॉलनी परिसरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.१५ लक्ष
२९.	झोन क्र.०९ अंतर्गत जवाहर कॉलनी परिसरातील अजिंक्य ज्वेलर्स ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३०.	झोन क्र.०६ अंतर्गत मा.उच्च न्यायालया पाठीमागे छोटे दुर्गामाता मंदिर ते श्री.संतोष चव्हाण यांचे दुकानापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	रु.३५ लक्ष
३१.	झोन क्र.०६ अंतर्गत नेहरुनगर भागामध्ये विविध ठिकाणी विविध गल्ल्यामध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३२.	वॉर्ड क्र.०३, एकतानगर येथे विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे.	रु.१० लक्ष
३३.	वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३४.	वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.	रु.२५ लक्ष
३५.	झोन क्र.०६ अंतर्गत न्यायनगर भागामध्ये सिमेंट काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष.
३६.	वार्ड क्रं ७०, पदमपुरा अंतर्गत मोचीमोहल्ला येथे काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष
३७.	वार्ड क्रं ७०, पदमपुरा अंतर्गत नवी बस्ती येथे गल्ल्यांमध्ये काँक्रीटीकरण करणे.	रु.२५ लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५७६:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६२, एन-६, संभाजी कॉलनी अंतर्गत विविध विकास कामांचे सन २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामधील लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

अ.क्र.	जुने कामांचे नाव	नवीन कामांचे नाव
१.	वॉर्ड क्र.६२ अंतर्गत विविध ठिकाणी ट्रिमिक्स काँक्रीटीकरणाचे काम करणे. SCR-Zone-05-P.No.20 Sr.No.28 (र.रु.४० लक्ष) (स्थायी समितीने सुचविलेली कामे वर्ग करणे.)	१. वॉर्ड क्र.६२, जी-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) २. वॉर्ड क्र.६२, एफ-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) ३. वॉर्ड क्र.६२, इ-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) ४. वॉर्ड क्र.६२, इ-सेक्टर मथुरानगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.)

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्रीमती शितल विरभद्र गादगे **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६२, एन-६, संभाजी कॉलनी अंतर्गत विविध विकास कामांचे सन २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामधील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

अ.क्र.	जुने कामांचे नाव	नवीन कामांचे नाव
१.	वॉर्ड क्र.६२ अंतर्गत विविध	१. वॉर्ड क्र.६२, जी-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन

	ठिकाणी ट्रिमिक्स काँक्रीटीकरणाचे काम करणे. SCR-Zone-05-P.No.20 Sr.No.28 (र.रु.४० लक्ष) (स्थायी समितीने सुचविलेली कामे वर्ग करणे.)	ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) २. वॉर्ड क्र.६२, एफ-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) ३. वॉर्ड क्र.६२, इ-सेक्टर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.) ४. वॉर्ड क्र.६२, इ-सेक्टर मथुरानगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे. (र.रु.१० लक्ष.)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५७७:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ येथील निविदा झालेले कामाचे स्थळ बदल करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र.	जुने लेखाशिर्ष	नवीन लेखाशिर्ष
१.	वॉर्ड क्र.१०५, सादातनगर, मक्का मस्जिद येथे रस्ता काँक्रेट करणे. रु.२० लक्ष.	१. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर आरेफभाई एम.सी.एन.पासुन ते आशफाक किराणा पर्यंत सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. रु.२० लक्ष
२.	वार्ड क्र.१०५ सादातनगर गल्ली नं ९ अंतर्गत सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष	२. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर अंतर्गत नॅशनल किराणा ते मोहम्मद सरताजभाई (M.S.E.B.) यांच्याघरापर्यंत सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष
३.	वार्ड क्र.१०५ सादातनगर अंतर्गत गल्ली नं.९ येथील Internal Subway सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष	३. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर अंतर्गत अली किराणा पासुन ते मदीना मस्जीद पर्यंत सिमेंट काँक्रीटींगकरण करणे. रु.२० लक्ष

सुचक:-श्री अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५ मध्ये निविदा झालेले कामाचे स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते.

अ.क्र.	जुने लेखाशिर्ष	नवीन लेखाशिर्ष
१.	वॉर्ड क्र.१०५, सादातनगर, मक्का मस्जिद येथे रस्ता काँक्रेट करणे. रु.२० लक्ष	१. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर आरेफभाई एम.सी.एन.पासुन ते आशफाक किराणा पर्यंत सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. रु.२० लक्ष
२.	वार्ड क्र.१०५ सादातनगर गल्ली नं ९ अंतर्गत सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष	२. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर अंतर्गत नॅशनल किराणा ते मोहम्मद सरताजभाई (M.S.E.B.) यांच्याघरापर्यंत सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष

३.	वार्ड क्र.१०५ सादातनगर अंतर्गत गल्ली नं.९ येथील Internal Subway सिमेंट काँक्रीटींग करणे. रु.२० लक्ष	३. वार्ड क्र.१०५ राहुलनगर, सादातनगर अंतर्गत अली किराणा पासुन ते मदीना मस्जीद पर्यंत सिमेंट काँक्रीटींगकरण करणे. रु.२० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ५५१:- **(सदरील विषय हा बुधवार दि.११.०७.२०१८ रोजीच्या सर्वसाधारण सभेमधील ऐनवेळीचा विषय आहे.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनी लि. (ACWUCL) यांनी मा. सर्वोच्च न्यायालयातील स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) नं.३२४१५-१६/२०१६ मध्ये दिनांक ४ जुलै २०१८ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या पुनरुज्जीवन बद्दल ते महानगरपालिकेस प्रस्ताव सादर करीत असून प्रकरणात पुढील तारीख मिळावी. कोर्टानी त्यांचा अर्ज स्विकारला असून प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १३/०७/२०१८ रोजी निश्चित केली. कोर्टात ACWUCL यांनी महानगरपालिकेस योजनेच्या पुनरुज्जीवन प्रस्तावही सादर केला. सदरील प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येत आहे.

प्रकरणाची थोडक्यात आत्तापर्यंतचे घटनाक्रम खालील प्रमाणे आहे

(१) सन २००५-२००६ मध्ये औरंगाबाद महानगपालिकेने संमातर जलवाहीनीचे नियोजन करुन UIDSSMT अंतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शासनास सादर केला होता. सन २००८ अखेर पर्यंत या प्रकल्पास शासनाची मान्यता मिळाली नसल्यामुळे व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन आयआयपीडीएफ या योजनेतून पीपीपी तत्वावर प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला असता मार्च २००९ मध्ये त्यास मंजूरी प्राप्त झाली. या योजनेच्या मुळ प्रस्तावात जायकवाडी ते नक्षत्रवाडी एमबीआर पर्यंतची संपूर्ण उपांगे व ४५८ कि.मी.लांबीची वितरण व्यवस्था या कामाचा समावेश ठेवण्यात आला होता, नंतर पीपीपी तत्वावर संपूर्ण वितरण व्यवस्था जलमापक यंत्र, मुख्य जलवाहीन्या इ. कामासह राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

(२) माहे एप्रिल २०११ मध्ये निविदा प्रक्रीयाचा अवलंब करुन औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनी लि. (ACWUCL) यांचेसोबत सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे भागीदारी (P.P.P.) तत्वावर करारनामा करण्यात आला. माहे सप्टेंबर २०११ मध्ये औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कं.लि. या नावाने खास उद्देश वाहक संस्था (SPV) स्थापन करण्यात आली. कन्सेशनर आणि त्यांचे भागीदार यांच्यात आपसात वाद निर्माण झाल्यामुळे निर्माण झालेले न्यायालयीन प्रकरण, मनपा पाणी पुरवठा उपविधीला सन २०१४ मध्ये मिळालेली शासनाची मान्यता विचारात घेऊन ही योजना पीपीपी तत्वावर राबविण्यास महाराष्ट्र शासनाने दिनांक २७/५/२०१४ रोजी मान्यता दिल्यानंतर दिनांक १/९/२०१४ पासून औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनीकेडे योजना हस्तांतरीत करण्यात आली. या योजनेतील समाविष्ठ विविध कामांची हस्तांतरणाच्या वेळीची किंमत रु. ७९२.२० कोटी निश्चीत करण्यात आलेली होती.

(३) सन २०१४ पासून ते २०१६ पर्यंतच्या एकूण २३ महिन्याच्या कालावधीत सदर कंपनीने फक्त ५.७७ टक्केच काम केल्यामुळे व कंपनीसोबत केलेल्या करारनाम्यातील अनेक बाबींचे उल्लंघन करुन अनियमितता केल्यामुळे दि. ३०/६/२०१६ रोजी झालेल्या महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने कंपनीसोबत केलेला करार संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. त्यानूसार सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन दिनांक ०१/१०/२०१६ पासून महानगरपालिकेने सदरील योजना ताब्यात घेतली.

(४) महानगरपालिकेच्या करार संपुष्टात आणण्याच्या कार्यवाही विरुध्द कंपनीने जिल्हा व सत्र न्यायालयात दावा क्र. ३२६/२०१६ दाखल केला होता. ज्यात जिल्हा न्यायालयाने करारनाम्यातील तरतुदीनूसार संपूर्ण प्रक्रीयेची अंमलबजावणी केल्याशिवाय कंपनी विरुध्द कोणतीही जबरदस्तीची (Coercive Measures) कार्यवाही करण्यात येऊ नये असे आदेश दिले होते.

(५) कन्सेशनरने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे Arbitration अपील नं. १२/२०१६ दाखल केले होते ते मा. उच्च न्यायालयाने खारीज केले व महानगरपालिकेने दाखल केलेले Arbitration अपील नं. १३/२०१६ मंजूर करुन दि. २४/१०/२०१६ रोजी महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिला. मा.उच्च न्यायालय यांनी कन्सेशरने दिलेल्या सर्व दलील फेटाळल्या आणि Observe केले की, ACWUCL कंपनी यांनी प्रकल्पात काहीही गुंतवणूक केली नाही आणि १८ महिन्याच्या कालावधीत काहीही काम केले नाही. इतकेच नव्हे तर प्रकल्पासाठी ते Financial Closure ही मिळवू शकले नाही.

(६) मा.उच्च न्यायालयाच्या निर्णया विरुध्द कन्सेशनरने प्रस्तुत याचिका मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली असून त्यात 'जैसे थे' आदेश पारीत आहे.

<u>कंपनीने दिनांक ४ जुलै २०१८ रोजी दिलेल्या प्रस्तावातील ठळक बाबी</u>

(७) कन्सेशनरने दिलेला प्रस्ताव सोबत **परिशिष्ट** म्हणून जोडलेला आहे.

(८) प्रस्तावातील भौतिक कामाच्या बद्दल प्रमुख बाबीं खालील प्रमाणे आहे.

अ) कन्सेशनरने योजनाचे संपूर्ण काम ३० महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

ब) कराराचे पुनरुज्जीवन झाल्यापासून एक महिन्याच्या आत कामास सुरुवात करणार आहेत.

क) योजनेतील समाविष्ठ कामे पूर्ण करण्यासाठी प्रस्तावाच्या अनुसूचि १ नूसार विविध कामाचे त्यांनी माईलस्टोन दिलेले आहे.

ड) कंपनीने माईलस्टोन नूसार मुख्य उपांगे यांची कामे प्रथमतः करण्याचे नमूद केले असून इतर अनुषंगिक कामे त्यानंतर हाती घेणार आहे. घरगुती नळ जोडणीस जलमापक बसविण्याचे काम, काम सुरु झाल्यापासून चार वर्षानंतर करण्याचे नियोजन दिलेले आहे.

इ) कंपनीने सुधारीत सेवास्तर गरजा (SLR) प्रस्तावाच्या अनुसूचि ३ प्रमाणे दिलेले असून त्यात प्रतिदिन पाणी पुरवठा, जलमापक यंत्र बसविणे, सर्वेक्षण, तक्रार निवारण, दरडोई पाणी पुरवठा व पाण्याची शुध्दता या बाबींचा समावेश आहे.

ई) प्रकल्पाचा आरंभ दिनांक निश्चित करण्यासाठी सर्व प्राधिकरणांच्या मान्यता आल्यानंतरच गृहीत धरण्यात यावा. कामाची प्रत्यक्ष सुरुवात करार पुनरुज्जीवीत झाल्याचा एक महिन्याच्या आत करण्यात येईल. मात्र यासाठी एका महिन्याच्या आत योजना कंपनीकडे वर्ग करण्यात यावी. तसेच पूर्वीच्या थकीत रक्कमेच्या पार्ट पेमेन्ट खाली परिच्छेद ०९ इ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात यावा.

(९) कंपनीच्या प्रस्तावातील आर्थिक बाबी खालील प्रमाणे आहेत.

अ) कंपनीशी केलेल्या करारानंतर दि. १ जुलै २०१७ पासून देशात 'सेवा व वस्तु कर' (GST) लागू झाल्यामुळे कामाच्या किंमतीत वाढ होणार असून कंपनीने मुळ करारनाम्यातील कलम ३० नूसार द्यावा लागणारा जीएसटी कराची भरपाई देण्याची मागणी केलेली आहे.

ब) फायनान्शियल क्लोजर संदर्भात महानगरपालिका व कन्सेशनर संयुक्तरित्या प्रकल्पासाठी निधी उभा करण्याकरीता सर्व शक्यतांची पडताळणी करतील अशी अट टाकली असून वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थाकडे प्रकल्पाच्या मालमत्ता व सुविधा गहाण ठेवण्याची परवानगी देण्याची मागणी केली आहे. तसेच वेळप्रसंगी गरज पडल्यास वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थेस योजनेत हस्तक्षेप करण्याचा हक्क देण्याची मागणी केली आहे.

क) प्रकल्पातील समाविष्ठ कामाव्यतिरिक्त करावयाच्या अतिरिक्त कामासाठी लागणारा अतिरिक्त निधी रुपये ११५.०० कोटी ३० महिन्याच्या आत महानगरपालिकेने कंपनीस उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे.

ड) प्रकल्पाची मुळ किंमत रुपये ७९२.०२ कोटी होती ती आता रुपये ९६६.२८ कोटी झालेली असून ही वाढीव किंमत रुपये १७४.०० कोटी प्रथमतः जीएसटी कराची भरपाई आणि नंतर वापरावयाच्या बांधकाम साहित्यातील बदलास मान्यता देवून भरुन काढण्याची विनंती केली आहे.

इ) कंपनीस महानगरपालिकेकडून देय असलेली पूर्वीच्या थकित रक्कमेपैकी रुपये २०.०० कोटी सुधारित करारनाम्यापासून ३० दिवसाच्या आत, रुपये २०.०० कोटी १० कि.मी. एमएस पाईपची खरेदी आदेश दिल्यापासून १५ दिवसाचे आत व उर्वरित देणे रक्कम ५ कि.मी.एमएस पाईप लाईन टाकून झाल्यापासून १५ दिवसाचे आत देण्याची मागणी केली असून यात जेवढा उशिर होईल तेवढा प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी वाढेल व त्यावर दंडनिय व्याज देय असेल अशी अट टाकलेली आहे.

ई) कन्सेशनरने पूर्वी दिलेली रुपये ७९.२२ कोटीची बँक गॅरंटी ही प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सुरक्षा अनामत म्हणून महानगरपालिकेकडे चालू ठेवण्याचे विनंती केली आहे.

फ) दिनांक ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत पाणीपट्टी दरात कोणताही बदल केले जाणार नाही.

(१०) प्रस्तावातील इतर मुद्दे खालील प्रमाणे आहे.

अ) नवीन करारनामा झाल्यानंतर महानगरपालिका व कंपनी एकमेकाविरुध्दचे कोणतेही नुकसान भरपाईचे दावे चालू ठेवणार नाहीत. जुन्या प्रलंबित दाव्या अंतर्गत या करारनाम्यांतर्गत कोणतेही नवीन दावा एकमेका विरुध्द करणार नाहीत.

ब) कन्सेशनर यांनी Essel Group Company ला लिड मेंबर म्हणून मान्यता मिळण्याची व SPML कंपनीचे सर्व भाग Essel कंपनीकडे हस्तांतरीत करण्याची परवानगी मागितली आहे.

क) कंपनीने प्रकल्प पुनरुज्जीवीत करण्याचे खालील फायदे सांगितलेले आहे.

- **(i)** नवीन निविदा प्रक्रीया करावी लागणार नसल्यामुळे वाढीव आर्थिक ताण पडणार नाही.
- **(ii)** कंपनीने पुर्वी काम केलेले असल्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी लवकर सुरु होऊ शकेल.
- **(iii)** कंपनीने महानगरपालिके विरुध्द रुपये ८५६.०० कोटीचा नुकसान भरपाईचा दावा लावलेला असून महानगरपालिकेने कंपनी विरुध्द रुपये १६६८.०० कोटीचा प्रतिदावा लावलेला आहे. हे सर्व दावे तातडीने संपुष्टात येतील.
- **(iv)** योजनेचे तातडीने नवीनीकरण होणार असल्यामुळे जनतेस याचा लाभ

होणार आहे.

<u>प्रस्तावावर अहवाल</u>

(११) महानगरपालिकेने यापूर्वी कंपनीने कराराचे पालन न केल्यामुळे विधीवत पध्दतीने करार संपुष्टात आणला आहे. यास मा.उच्च न्यायालयानेही मान्यता दिलेली आहे.

(१२) महानगरपालिकेतील मागील अभिलेख पाहता कंपनीने सन २०१४ ते २०१६ या कालावधीत कार्यक्षमपणे आपली कामे केली नाही. त्यांची आर्थिक बाजू सक्षम नव्हती, त्यांनी निधी गुंतवणूक केली नाही, माईलस्टोन प्रमाणे प्रकल्प राबविला नाही आणि एकंदरीत पाणी पुरवठा सेवेत सुधार करु शकले नाहीत. यासाठी कंपनीची त्यावेळची अकार्यक्षमता स्पष्ट होते. मात्र कंपनीकडून काम करुन घेण्याची जबाबदारी महानगरपालिकेची पण होती. महानगरपालिकेने कंपनीच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र इंजिनिअर व स्वतंत्र ऑडीटर यांची नेमणूक केली होती. मात्र सदरील यंत्रणा कार्यक्षम असल्याचे दिसून येत नाही.

(१३) करारनाम्यात भविष्यात येणाऱ्या अडचणी, शहरातील नागरिकांच्या मागण्या, सुयोग्य अंमलबजावणी व नियंत्रण यासाठी आवश्यक तरतुदी इत्यादी बाबींचा स्पष्टपणे मुळ करारनाम्यात समावेश न झाल्यामुळे त्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न कंपनीने केल्याचे दिसून येते. प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करावयाचे झाल्यास आधीच्या करारातील संदिग्ध बाबी सुस्पष्टपणे नमूद करुन सुधारीत करता येतील.

(१४) पाणी पुरवठा ही अतिशय संवेदनाक्षम सेवा असून त्यात सद्यस्थिती पाहता तातडीने दुरुस्ती करुन नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. सदरील प्रकरणी निर्णय घेतांना ही बाब लक्षात घेणे महत्वाचे वाटते.

<u>कंपनीच्या प्रस्तावावर प्रशासनाचे मत</u>

(१५) कंपनीने येणाऱ्या ३० महिन्यात योजनेचे काम पूर्ण करण्याचे मान्य केले असून तसे झाल्यास सदरील कामे करण्याबाबत शहराच्या दृष्टीकोणातून ही बाब चांगली आहे. कंपनीने सुधारित माईलस्टोन (प्रगतीचे टप्पे) दिलेले असून ते योग्य आहेत आणि त्या टप्प्याप्रमाणे कामे झाल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकेल. प्रस्तावास आधी मुख्य कामे नंतर अनुषंगिक कामे व शेवटी घरगुती नळ जोडणीस मीटर लावणे या पध्दतीने कामाचा क्रम ठरविलेला असून ही बाब प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने आता योग्य आहे. प्रस्तावात दिलेले सेवास्तर (SLRs) मात्र जास्त सुस्पष्ट असावेत. त्यात दर वर्षाला उपलब्ध करावयाचे मानक स्पष्ट असावेत.

(१६) काम सुरु झाल्याचा दिनांक निश्चित करण्यासाठी सर्व प्रकाराच्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतरचा दिनांक गृहीत धरण्यात आलेला आहे. ही बाब गैरवाजवी असून एखाद्या छोटया परवानगी अभावी कराराचा कालावधी विनाकारण वाढला जाणार आहे. त्यामुळे यात सुधारणा आवश्यक असून पहिल्या माईलस्टोनला आवश्यक असणाऱ्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर काम सुरु झाल्याचा दिनांक समजता येऊ शकते. मात्र प्रत्येक माईलस्टोनच्या पूर्वी त्या त्या माईलस्टोनला आवश्यक असणारी परवानगी मिळण्याकरीता महानगरपालिका कंपनीला मदत करेल.

(१७) कंपनी यापूर्वी वित्तीय ताळेबंद (Financial Closure) उपलब्ध करु शकली नव्हती. प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कंपनी लागणारा निधी कशा पध्दतीने व केव्हा उभा करणार आहेत, याचा तपशिल देणे आवश्यक राहील. दिलेल्या तपशिलाप्रमाणे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणतीही वित्तीय तुट भासणार नाही याची महानगरपालिकेस खात्री पटल्यानंतरच प्रकल्पास मान्यता देणे योग्य होईल. Financial Closure उपलब्ध करुन घेण्यासाठी महानगरपालिकेने कंपनीस आवश्यक ती मदत करायला हरकत नाही. कंत्राटदारास

प्रकल्पासाठी लागणारे वित्तीय सहाय्य, वित्तीय संस्थांकडून उभे करता येईल. परंतु त्या रक्कमेच्या परतफेडीसाठी महानगरपालिका जबाबदार असणार नाही. त्यासाठी महानगरपालिकेची कोणतीही स्थावर मालमत्ता वित्तीय संस्थेकडे गहाण ठेवता येणार नाही. परंतु कंत्राटदाराच्या करारनाम्यानूसार कंत्राटदारास पाणी पुरवठा योजना चालविण्याकरीता जे जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्या अधिकारावर आणि त्यांच्या मालकीच्या उपांगांवर वित्तीय संस्थेचा चार्ज निर्माण करता यईल.

(१८) मुळ प्रकल्पाच्या किंमतीत प्रचलित बाजार भावामुळे झालेल्या वाढीस कंपनीने केलेला कसूर व विलंब ही प्रमुख कारणे असल्यामुळे त्या वाढीसाठी महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

(१९) योजनेची आवश्यकता विचारात घेऊन अतिरिक्त कामाच्या व्याप्तीमध्ये (Scope) झालेल्या वाढीबाबत शासनास सुधारित प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मान्यता घेता येईल.

(२०) कंपनीने भराव्या लागणाऱ्या जीएसटी कराची मागणी केली आहे. GST हे शासन नियमाप्रमाणे देय असल्यामुळे जो काही जीएसटी कर देय होईल, तो मान्य करण्यास हरकत नसावी. लागणारी रक्कमेची मागणी शासनाकडून अनुदान स्वरुपात करता येईल.

(२१) कंपनीने सध्याचे प्रचलीत बाजारभाव विचारात घेता जीएसटी करा व्यतिरिक्त वाढलेली प्रकल्पाची किंमत मर्यादित राहण्यासाठी मटेरिअल (MOC) मध्ये बदलाची परवानगी अपेक्षीलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बदलल्या जाणाऱ्या साहीत्याच्या गुणवत्ता व उपयोगिता, याबाबत अभिप्राय घेवून जर ते अभिप्राय अनुकूल असतील तर अशी परवानगी देण्यास हरकत नसावी.

(२२) कंपनीचे म्हणणे आहे की, त्यांच्या हिशोबाने त्यांची जी रक्कम महानगरपालिकेकडे थकीत आहे, ती वरील परिच्छेद ९ इ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तीन टप्प्यात त्यांना देण्यात यावी. यावर असे मत आहे की, प्रथमतः योजनेचे पुनरुज्जीवन करावयाचे झाल्यास आतापर्यंत झालेल्या कामाचे तांत्रिक व आर्थिक हिशोब अंतिम कराव्या लागतील. दुसरा कंपनी यांनी सुचविलेल्या टप्प्यांच्या ऐवजी प्रशासनाचे असे मत आहे की, कंपनीबाबत विश्वासाहर्ता निर्माण होण्यासाठी कंपनीने काम सुरु केल्यानंतर पहील्या तीन महिन्यात कंपनी नव्याने जे काम करेल त्या कामाच्या किंमतीच्या २० टक्के इतकी होणारी रक्कम किंवा कन्सेशनरच्या Verified थकीत देयक रक्कमेच्या २० टक्के रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम अदा करण्यात येईल व या सुत्राने उर्वरित थकित रक्कम पुढील कामाच्या प्रगती नूसार देय राहील.

(२३) कंत्राटदाराने दिलेली रुपये ७९.२२ कोटीची बँक गॅरंटी प्रकल्प पुर्ण होईपर्यंत अंमलबजावणी सुरक्षा अनामत (Performance security) म्हणून ठेवण्यास हरकत नसावी. मात्र ती रक्कम नॅशनल बँक मध्ये ठेवण्यात यावी.

(२४) प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रचलित पाणी पट्टीचे दर कायम ठेवणेस हरकत नसावी.

(२५) कंपनीने सुचविले आहे की, नवीन करारनामा सुधारीत करण्याचे मान्य झाल्यास जुने सर्व परस्पर दावे/प्रतिदावे संपुष्टात आणाव्यात. योजनेच्या पुनरुज्जीवनासाठी तडजोड करावयाची झाल्यास, सदरील तडजोड करारनामा लवाद न्यायाधिकरणासमोर (Arbitration Tribunal) ठेऊन निवाडा (Award) म्हणून त्यावर शिक्कामोर्तब करुन घेणे योग्य राहील जेणे करुन कंपनीवर तो बंधनकारक राहील.

(२६) कंपनीच्या भागीदारीत बदल करुन मुख्य भागीदार बदलणे (SPML ऐवजी Essel मेंबर करणे) या बाबतीत त्या विषयाचे तज्ञ कायदे विषयक सल्लागाराचा सल्ला घेवून निर्णय घेता येईल.

(२७) मुळ करारनाम्यात प्रकल्पाच्या संनियत्रणासाठी स्वतंत्र अभियंता व लेखा परिक्षक नेमण्याचे संयुक्तीक अधिकार कन्सेशनर व महानगरपालिकेस देण्यात आलेले होते. या ऐवजी महानगरपालिकेच्या वतीने कामावर सनियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम Project Management Consultant यांची नियुक्ती करणे योग्य वाटते. ह्या प्रमाणे करारनामा सुधारित करणे योग्य राहील.

(२८) मूळ करारनाम्यात इतर काही बाबी पण महानगरपालिकेच्या हिताशी सुसंगत नसल्यामुळे करारनामा सुधारित करते वेळेस त्यामध्येही दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

<u>पर्याय</u>

(२९) वरील सर्व बाबी लक्षात ठेवून महानगरपालिकेच्या समोर दोन पर्याय उपलब्ध आहे.

(अ) संपुष्टात आणलेल्या कराराच्या निर्णयावर कायम राहणे : तसे केल्यास योजनेची डिझाइनची पुनश्च पडताळणी करता येईल, करारनाम्याची सुयोग्य अटी तयार करता येईल, योजना अभियांत्रिकी पुरवठा कंत्राट पध्दतीवर (EPC Mode) राबविण्याचे प्रयत्न करता येईल, महानगरपालिकेस धोरण ठरविण्याची (Flexibility) परिवर्तनशिलता राहील. मात्र वाढलेल्या किंमतीमुळे लागणारा निधी उपलब्ध होणे अवघड होईल आणि यासाठी मोठा कालापव्यय होण्याची शक्यता राहील.

(ब) प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करणे : प्रकल्पाचे पुनरुज्जीवन केल्यास प्रकल्प तातडीने मार्गी लागू शकेल, जनतेस लवकर पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येईल, किंमतीत काही प्रमाणात बचत होईल. मात्र कन्सेशनरची यापूर्वीची विश्वासहर्ता कमी झाली असल्यामुळे प्रकल्प पुर्ण होईपर्यंत शंका राहील. तसेच पीपीपी तत्वावर करारनामा केलेला असल्यामुळे काही बाबींमध्ये महानगरपालिकेला भविष्यात निर्णय घेण्यासाठी बंधने राहतील.

<u>मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव</u>

(३०) वरील सर्व बाबींचे साधक बाधक विचार केल्यानंतर असे वाटते की, यापूर्वी जरी कपंनी यशस्वीरित्या कामे करण्यास अयशस्वी ठरली होती, तरी ज्या कारणांमुळे कंपनी अयशस्वी ठरली, त्या कारणांवर योग्य उपाययोजना केल्यास, योजनेचे पुनरुज्जीवन शक्य आहे. तसे झाल्यास सध्याच्या पाणी पुरवठा योजनेत तातडीने सुधारणा करता येईल, सदरील योजनेसाठी उपलब्ध निधीचा योग्य वापर करता येईल, योजना तातडीने सुरु करता येईल आणि नुकसान भरपाईचे दावे/प्रतिदावे संपुष्टात आणता येईल.

(३१) मात्र वरील सविस्तर प्रमाणे विश्लेषण केल्याप्रमाणे सदरील योजनेचे पुनरुज्जीवन वरील परिच्छेद १५ ते २८ मध्ये नमूद केल्या प्रमाणे खालील अटींच्या अधीन करण्यात यावे.

(१) प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेण्यात यावी. त्याप्रमाणे निश्चित झालेल्या सुधारित माईलस्टोन प्रमाणे कंपनीने येणाऱ्या ३० महिन्यात योजनेचे काम पूर्ण करावे. प्रस्तावास आधी मुख्य कामे, नंतर अनुषंगिक कामे व शेवटी घरगुती नळ जोडणीस मीटर लावणे या पध्दतीने कामे करावे. पाणी पुरवठयाचे वर्षनिहाय साधावयाचे सेवास्तर (SLRs) महानगरपालिकेशी चर्चा करुन अंतिम करावेत.

(२) पहिल्या माईलस्टोनला आवश्यक असणाऱ्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर काम सुरु झाल्याचा दिनांक समजण्यात यावा. मात्र प्रत्येक माईलस्टोनच्या पूर्वी त्या त्या माईलस्टोनला आवश्यक असणारी परवानगी मिळवून देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

(३) प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कंपनी लागणारा निधी कशा पध्दतीने व केव्हा उभा करणार आहेत, याचा तपशिल देणे कंपनीला आवश्यक राहील. दिलेल्या तपशिलाप्रमाणे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणतीही वित्तीय तुट भासणार नाही याची महानगरपालिकेस खात्री पटल्यानंतरच प्रकल्पास मान्यता देणे योग्य होईल. Financial Closure उपलब्ध करुन घेण्यासाठी महानगरपालिका कंपनीस आवश्यक ती मदत करतील. कंत्राटदारास प्रकल्पासाठी लागणारे वित्तीय सहाय्य, वित्तीय संस्थांकडून उभे करता येईल. परंतु त्या रक्कमेच्या परतफेडीसाठी महानगरपालिका जबाबदार असणार नाही. कंत्राटदाराच्या करारनाम्यानूसार कंत्राटदारास पाणी पुरवठा योजना चालविण्या करीता जे जे अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्या अधिकारावर वित्तीय संस्थेचा चार्ज निर्माण करता यईल. मात्र महानगरपालिकेची कोणतीही स्थावर मालमत्ता वित्तीय संस्थेकडे गहाण ठेवता येणार नाही.

(४) मुळ प्रकल्पाच्या किंमतीत प्रचलित बाजार दरामुळे झालेल्या वाढीस कंपनीने केलेला कसूर व विलंब ही प्रमुख कारणे असल्यामुळे त्या वाढीसाठी महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

(५) योजनेची आवश्यकता विचारात घेऊन अतिरिक्त कामाच्या व्याप्ती (Scope) झालेल्या वाढीबाबत शासनास सुधारित प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मान्यता घेता येईल.

(६) कंपनीने भराव्या लागणाऱ्या जीएसटी हे शासन नियमाप्रमाणे देय असल्यामुळे जो काही जीएसटी कर देय होईल, तो मान्य करण्यात येईल. लागणारी रक्कमेची मागणी शासनाकडून अनुदान स्वरुपात करता येईल.

(७) मटेरिअल (MOC) मध्ये बदल या बाबतीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बदलल्या जाणाऱ्या साहीत्याच्या गुणवत्ता व उपयोगिता याबाबत अभिप्राय घेऊन जर ते अभिप्राय अनुकूल असतील तर अशी परवानगी देण्यात येईल.

(८) आतापर्यंत झालेल्या कामाचे तांत्रिक व आर्थिक हिशोब अंतिम करण्यात येतील. थकित रक्कम बद्दल कंपनीने काम सुरु केल्यानंतर पहील्या तीन महिन्यात कंपनी नव्याने जे काम करेल त्या कामाच्या किंमतीच्या २० टक्के इतकी रक्कम किंवा कंपनीच्या थकीत देयक रक्कमेच्या २० टक्के रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम अदा करण्यात येईल व या सुत्राने उर्वरित पुढील कामाच्या प्रगती नूसार थकीत रक्कम देय राहील.

(९) कंत्राटदाराने दिलेली रुपये ७९.२२ कोटीची बँक गॅरंटी प्रकल्प पुर्ण होईपर्यंत अंमलबजावणी सुरक्षा अनामत (Performance security) म्हणून नॅशनल बँक मध्ये ठेवण्यात यावी.

(१०) माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रचलित पाणी पट्टीचे दर कायम ठेवण्यात येतील.

(११) सदरील तडजोड करारनामा लवाद न्यायाधिकरणासमोर (Arbitration Tribunal) ठेऊन निवाडा (Award) म्हणून त्यावर शिक्कामोर्तब करुन घ्यावा लागेल.

(१२) कंपनीच्या भागीदारीत बदल करुन मुख्य भागीदार बदलणे (SPML ऐवजी Essel मेंबर करणे) या बाबतीत त्या विषयातील तज्ञ कायदे विषयक सल्लागाराचा सल्ला घेवून निर्णय घेता येईल.

(१३) कंपनीच्या कामावर सनियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम Project Management Consultant यांची नियुक्ती करण्यात येईल.

(१४) मूळ करारनाम्यात काही बाबी महानगरपालिकेच्या हिताशी सुसंगत नसल्यामुळे करारनामा सुधारित करते वेळेस त्यामध्येही दुरुस्ती करता येईल.

(१५)सुधारित करारनाम्यास शासनाची परवानगी घेण्यात येईल.

(३२) वरील अभिप्राय हे महानगरपालिकेचे सर्व हित अबाधीत ठेवून (Without Prejudice) देण्यात आले आहे.

(३३) करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर उचित निर्णयास्तव सादर करण्यात येते.

मा.महापौर :दिनांक ११.०७.२०१८ रोजीच्या सभेत विषय क्रमांक-५५१ नुसार मा.आयुक्त यांनी समांतर जलवाहिनी संदर्भात प्रस्ताव ठेवला होता. त्यावेळी सभागृहात स.सदस्यांनी या विषयावर अभ्यास करणेसाठी वेळ मागितला होता व त्या विषयावरच आजची सभा आयोजित केली होती. परंतु जी काल जिल्ह्यात कायगांव येथे श्री.काकासाहेब शिंदे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून जलसमाधी घेतली. त्यावर सभागृहात चर्चा केली व जो विषय क्रमांक-५५१ चा आहे. त्यावर स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल. सभागृहाच्या भावना लक्षात घेता आता आजची सभा तहकूब करण्यात येते.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद